जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 NOV 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात रंगभूमी दिनानिमित्त एकांकिका सादरीकरण

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** रंगभूमी दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी 'गोडावून' या एकांकिकेचे नुकतेच सादरीकरण केले. कुठल्याही परिस्थितीत माणसाने आपले माणूसपण हरवू नये, सतत सकारात्मक राहावे, असा एकांकिकेचा आशय आहे. ज्ञानेश मुळे यांनी एकांकिकेचे दिग्दर्शन केले. यावेळी विभागप्रमुख डॉ. एन.व्ही.चिटणीस, डॉ. व्ही.बी. ककडे व विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
5 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# गोडावून एकांकिकेचे विद्यापीठात सादरीकरण

**कोल्हापूर :** रंगभूमी दिनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी 'गोडाऊन' या एकांकिकेचे सादरीकरण केले. रंगभूमी दिनाचे औचित्य साधून 'गोडावून' ही एकांकिका नाट्यशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी विभागाच्या सभागृहात सादर केली. जग ही एक बंदीशाळा असली आणि प्रत्येकाचा यातून वेगवेगळ्या पद्धतीने सुटण्याचा प्रयत्न सुरू असला तरी कुठल्याही परिस्थितीत माणसाने आपले माणूसपण हरवू नये, सतत सकारात्मक राहावे, असा एकांकिकेचा आशय आहे. ज्ञानेश मुळे यांनी एकांकिकेचे दिग्दर्शन केले. यावेळी विभाग प्रमुख डॉ. एन. व्ही. चिटणीस, डॉ. व्ही. बी. ककडे आदी उपस्थित होते.